महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक / लघुलेखक उच्चश्रेणी या संवर्गातील पदभरतीसाठी जाहिरात सन २०१४.

महाराष्ट्र शासनाने मुंबई सा.बां.परिमंडळाला दिलेल्या प्राधिकारानुसार खालील संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी विहित शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांकडून सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे मार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी खाली दिलेल्या संवर्गाकरीता केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.pwdmumbaicircle.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या http.//www mahapwd.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

❖ परिक्षेचे वेळापत्रक :-

अ.क्र	प्रक्रिया	दिनांक
१.	ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा कालावधी	दिनांक **08/08/2014** (सकाळी १२.०० पासून) ते दिनांक **21/08/2014** (सायंकाळी ०५.३० पर्यंत)
२.	ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरल्यानंतर तयार होणाऱ्या चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये परीक्षा शुल्क स्वीकृतीचा अंतिम दिनांक	दिनांक **22/08/2014**
३.	लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा कालावधी	दिनांक **08/09/2014** (सकाळी १२.०० पासून) ते दिनांक **13/09/2014** (सायंकाळी ०५.३० पर्यंत)
४.	लेखी परिक्षेचा दिनांक	दिनांक **14/09/2014** (संभाव्य)

भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल वगैरे सूचना www.pwdmumbaicircle.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

पदभरती करीता पदांचा तपशिल खालील प्रमाणे.

१. **पदनाम :- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट ब (अराजपत्रित)**

वेतनश्रेणी :- रु.९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु.४,३००/-)

उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे-१९६)

अ.क्र	सामाजिक आरक्षण	एकुण भरावयाची पदे	समांतर आरक्षणाचा तपशिल.		सर्वसाधारण
			महिला 30%	खेळाडू 5%	
१.	अनुसुचित जाती	29	9	1	19
२.	अनुसुचित जमाती	10	3	0	7
३.	विमुक्त जाती (अ)	6	2	0	4
४.	भटक्या जाती (ब)	3	1	0	2
५.	भटक्या जाती (क)	25	7	1	17
६.	भटक्या जाती (ड)	7	2	0	5
७.	विशेष मागास प्रवर्ग	9	3	0	6
८.	इतर मागास वर्ग	0	0	0	0
९.	विशेष मागास प्रवर्ग (अ)(एसबीसी-ए)	5	1	0	4
१०.	शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (ई.एस.बी.सी.)	17	5	1	11
११.	खुला	85	25	4	56
	एकूण पदे	**196**	**58**	**7**	**131**

२. **पदनाम** :- **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (स्थापत्य) गट क**
वेतनश्रेणी :- **रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु.२,४००/-)**
उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे - ४५)

अ.क्र.	सामाजिक आरक्षण	एकुण भरावयाची पदे	समांतर आरक्षणाचा तपशिल.						सर्वसाधारण
			माजी सैनिक 15%	महिला 30%	खेळाडू 5%	अंशकालीन 10%	प्रकल्पग्रस्त 5%	भूकंपग्रस्त 2%	
१.	अनुसुचित जाती	2	0	0	0	0	0	0	2
२.	अनुसुचित जमाती	3	0	0	0	0	0	0	3
३.	विमुक्त जाती (अ)	0	0	0	0	0	0	0	0
४.	भटक्या जाती (ब)	0	0	0	0	0	0	0	0
५.	भटक्या जाती (क)	2	0	0	0	0	0	0	2
६.	भटक्या जाती (ड)	0	0	0	0	0	0	0	0
७.	विशेष मागास प्रवर्ग	1	0	0	0	0	0	0	1
८.	इतर मागास वर्ग	4	0	1	0	0	0	0	3
९.	विशेष मागास प्रवर्ग (अ) (एसबीसी-ए)	2	0	0	0	0	0	0	2
१०.	शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (ई.एस.बी.सी.)	5	1	2	0	0	0	0	2
११.	खुला	26	4	8	1	2	1	0	10
	एकूण	**45**	**5**	**11**	**1**	**2**	**1**	**0**	**25**

३. **पदनाम** :- **लघुलेखक (उच्चश्रेणी)**
वेतनश्रेणी :- **रु.९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु.४,३००/-)**
उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे - २)

अ.क्र.	सामाजिक आरक्षण	एकुण भरावयाची पदे	समांतर आरक्षण						सर्वसाधारण
			माजी सैनिक 15%	महिला 30%	खेळाडू 5%	अंशकालीन 10%	प्रकल्पग्रस्त 5%	भूकंपग्रस्त 2%	
१.	अनुसुचित जाती	0	0	0	0	0	0	0	0
२.	अनुसुचित जमाती	0	0	0	0	0	0	0	0
३.	विमुक्त जाती (अ)	0	0	0	0	0	0	0	0
४.	भटक्या जाती (ब)	0	0	0	0	0	0	0	0
५.	भटक्या जाती (क)	0	0	0	0	0	0	0	0
६.	भटक्या जाती (ड)	0	0	0	0	0	0	0	0
७.	विशेष मागास प्रवर्ग	0	0	0	0	0	0	0	0
८.	इतर मागास वर्ग	0	0	0	0	0	0	0	0
९.	विशेष मागास प्रवर्ग (अ) (एसबीसी-ए)	0	0	0	0	0	0	0	0
१०.	शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (ई.एस.बी.सी.)	0	0	0	0	0	0	0	0
११.	खुला	02	0	0	0	0	0	0	02
	एकूण	**02**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**02**

- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे,रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) परिमंडळ, मुंबई यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. वर दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा शासन विहीत नियमानुसार विचार केला जाईल.
- पदभरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) परिमंडळ, मुंबई यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.
- ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नावे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना

वरील भरतीच्या पदासाठीच्या लेखी परिक्षेसाठी स्वतंत्ररित्या अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही अथवा अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

- उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक प्रमाणपत्रे / कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी काळजीपुर्वक / विचारपुर्वक भरावी. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.
- शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ दिनांक ०५.०६.२०१४ नुसार गट- क मधिल कोणत्याही पदासाठी मुलाखत घेण्यात येणार नसल्याने भरती प्रक्रीयेत पात्र झालेल्या उमेदवारांची लेखी परिक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्याच आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल व अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधातील मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणी करीता कागदपत्रे पडताळणी समितीकडे उपलब्ध करून दयावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

❖ पात्रता :-

खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता / अनुभव **०८/०८/२०१४** या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	पदनाम	वय	शैक्षणिक व तांत्रिक अर्हता	इतर अर्हता
१	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	१८ ते ३३	१. उमेदवाराने शासनमान्य स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) अथवा शासनमान्य अशी समतुल्य अर्हता धारण करणे आवश्यक आहे. टिप : स्थापत्य अभियांत्रिकी मधील **फक्त पदविकाधारक व समतुल्य अर्हता धारण केलेल्या पदविका धारकांनीच** अर्ज करावेत.	१) उमेदवार D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. **किंवा** O स्तर **किंवा** B स्तर **किंवा** C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र.मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असावा. २) भाषा परिक्षा, शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एसएससी) मराठी व हिंदीसह उत्तीर्ण किंवा एतदर्थ मंडळाची परिक्षा नियुक्तीपासून सहा महिन्याच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक.
२	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक	१८ ते ३३	१. उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा. २. शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्ष मुदतीचा पाठ्यक्रम उत्तीर्ण असावा किंवा आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन (वास्तुशास्त्रीय आरेखक/ कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक) / सिव्हिल ड्राफ्ट्समन (स्थापत्य आरेखक) हि अर्हता धारण करीत असावा किंवा शासनमान्य स्थापत्य अभियांत्रिकी मधील उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असावा.	
३	लघुलेखक (उच्चश्रेणी)	१८ ते ३३	१. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी.) अथवा महाराष्ट्र शासनाने समतुल्य म्हणून जाहीर केलेली अर्हता धारण करणे आवश्यक. २. लघुलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मराठी **लघुलेखन १२० शब्द प्रति मिनीट** हि अर्हता धारण करणे आवश्यक. ३. **टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मराठी ३० शब्द प्रति मिनीट किंवा इंग्रजी ४० शब्द प्रति मिनीट उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण** धारण करणे आवश्यक.	

❖ वयोमर्यादेतील सवलत :-

वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक **०८/०८/२०१४** रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

१. मागासवर्गीय उमेदवार :- ३८ वर्षे
२. अपंग/प्रकल्पग्रस्त/अपंग माजी सैनिक/भूकंपग्रस्त/स्वतंत्र सैनिक निर्देशित पाल्य /१९९१ चे जनगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी /शासकीय कर्मचारी - ४५ वर्ष.
३. खेळाडू ५ वर्ष सवलत (खुला प्रवर्ग ३३ + ५, मागासप्रवर्ग ३८ + ५)
४. अंशकालीन उमेदवार : ४६ वर्षे.
५. अनुक्रमांक २ करीता, सन १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान शासकीय तंत्रशिक्षण संस्थेचा एक वर्ष मुदतीचा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाच्या पाठयक्रमाची परिक्षा उत्तीर्ण -४७ वर्ष.
६. माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांकः मासैक-1010/प्र.क्र.279/10/16-अ, दिनांक 20 ऑगस्ट, 2010 प्रमाणे राहील.

❖ शासकीय सेवेमध्ये भरती झाल्यास होणारी उपलब्धी :-

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	वेतन अंदाजित (रु)	पदोन्नतीच्या संधी
१	कनिष्ठ अभियंता गट ब (अराजपत्रित)	पी.बी.१ ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३००	मुळ वेतन १०१००/- ग्रेड वेतन + ४३०० /- = एकुण १४४००/- + इतर भत्ते	कार्यकारी अभियंता पर्यंत
२.	लघुलेखक(उच्चश्रेणी)	पी.बी.१ ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३००	मुळ वेतन १०१००/- ग्रेड वेतन + ४३०० /- = एकुण १४४००/- + इतर भत्ते	स्वीय सहाय्यक पर्यंत
३.	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक गट क	पी.बी.२ ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००	मुळ वेतन ७५१०/- ग्रेड वेतन + २४०० /- = एकुण ९९१०/- + इतर भत्ते.	उप विभागीय अधिकारी पर्यंत

❖ नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी :-

१) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२) सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) विहित वयोमर्यादेतील शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व त्याबाबची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

❖ परिक्षेचे स्वरूप :-

अ.क्र.	पदनाम /संवर्ग	परिक्षेसाठीचे गुण		
		लेखीपरिक्षा	व्यावसायिक परिक्षा	एकुण गुण
१.	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट ब (अराजपत्रित)	**200**	**---**	**200**
२.	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक - गट क	**120**	**80**	**200**
३.	लघुलेखक उच्चश्रेणी - गट क	**120**	**80**	**200**

❖ लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व कार्यक्रम :-

१. लेखी परिक्षेची प्रश्न पत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाची असेल. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. (निगेटिव्ह) नकारात्मक गुणपध्दत (मार्क सिस्टिम) अवलंबली जाणार नाही.

२. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाची लेखी परिक्षा इंग्रजी, मराठी, चालू घडामोडी, सामान्य ज्ञान, पदांसंबंधीचे तांत्रिक ज्ञान, व बुध्दीमत्ता चाचणी यावर आधारीत असेल.

३. लघुलेखक (उच्चश्रेणी) या पदाची लेखी परिक्षा इंग्रजी / मराठी, चालू घडामोडी, सामान्य ज्ञान व बुध्दीमत्ता चाचणी यावर आधारीत असेल.

४. शासन निर्णय क्र.प्रनिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३ अ, मंत्रालय मुंबई दि.२७/६/२००८ मध्ये विर्निधिष्ठ केल्यानुसार लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांनाच व्यवसायिक चाचणी देता येईल. तसेच दिनांक १९/१०/२००७ च्या आदेशातील परिच्छेद क्र.५ मधील आ.क्र.१ ते आ.क्र.४ येथील तरतूदीनुसार कार्यवाही करतांना गुणवत्ता यादीत अंतर्भाव करणेसाठी उमेदवारांने एकूण गुणाच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहिल.

❖ परिक्षा शुल्क :-

अ.क्र.	पदनाम /संवर्ग	खुला प्रवर्ग	राखीव प्रवर्ग
१.	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट ब (अराजपत्रित)	**300**	**200**
२.	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक - गट क	**300**	**200**
३.	लघुलेखक उच्चश्रेणी - गट क	**300**	**200**

टिप :- १. माजी सैनिकांना परिक्षा शुल्क माफ आहे.

२. उक्त परिक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑन लाईन अर्जा सोबत प्राप्त झालेल्या चलनाव्दारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.

३. वर दर्शविण्यात आलेले परिक्षा शुल्क हे बँक प्रक्रिया शुल्क वगळून आहे.

४. स्टेट बँक ऑफ इंडीया कडून रु.६०/- इतके बँक प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

❖ अर्ज करण्याची पध्दत :-

१) प्रस्तुत पदांकरीता फक्त www.pwdmumbaicircle.in या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेलेच अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चूकिचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहीती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना मुंबई सार्वजनिक बांधकाम परीमंडळ, मुंबई हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना (www.pwdmumbaicircle.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत फी भरण्याचे चलन ३ प्रतीमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहिल. सदरच्या ३ प्रतीपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेकडून परत मिळेल, त्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाची मूळ प्रत उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी घेतली जाणार नाही. बँकेत परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक **08/08/2014** ते **22/08/2014** असा आहे. अंतिम दिनांका नंतर बँकेत परीक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

३) उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती www.pwdmumbaicircle.in या संकेतस्थळावरती पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वतःचा वापरातील ई-मेल आयडी आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी द्वारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार असल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. तसेच स्वतःचा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करुन www.pwdmumbaicircle.in या संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहित पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

५) ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेनंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

६) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी अडचणी असल्यास भ्रमणध्वनी क्रमांक **7776900546/ 47/ 48/ 49** कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

❖ सर्वसाधारण सुचना :- (कार्यपद्धती,अटी व शर्ती)

१) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा / वेळापत्रक / परिक्षाकेंद्र / बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सबब सदर संकेतस्थळाला भरतीप्रकीये दरम्यान वेळोवेळ भेट देवून भरती प्रक्रीयेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्रे डाऊनलोड करुन घेणेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

२) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

३) निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर (निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच, एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवंलब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवून त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) उमेदवारास लेखी परिक्षा व कागदपत्रे पडताळणी, व्यावसायीक चाचणी इत्यादी करिता स्वखर्चाने यावे लागेल.

५) उमेदवारांनी यापूर्वी जरी त्याचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरी त्यांनी या पदांच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहित ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

६) उमेदवारास कार्बनलेस स्वरुपाची उत्तरपत्रिका परिक्षेच्यादिवशी देण्यात येणार आहे. उत्तरपत्रिकेची प्रत्र परिक्षा कालावधी संपलेवर परिक्षार्थीने हस्तगत करावी.

७) संकेत स्थळावरुन उत्तरतालिका परिक्षा झालेल्या दिवसापासून ५ दिवसात प्रसिध्द केली जाईल. जेणेकरुन उमेदवारास स्वतःचे गुण काढता येतील.

८) उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांचे ओ.एम.आर.स्कॅनिंग द्वारे प्राप्त गुण वैयक्तीक रित्या पडताळता येण्याची सुविधा उक्त संकेतस्थळावर परिक्षेनंतर १५ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानंतर उमेदवारांची कागदपत्र पडताळणी, प्रात्यक्षिक परिक्षा इत्यादी प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

९) लेखी परिक्षेचे प्रात्यक्षिक परिक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परिक्षेचे प्रवेश पत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वतः डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने उमेदवारास पाठविले जाणार नाही.

१०) उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जान नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परिक्षेच्या प्राथमिक गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

❖ अंतिम निवड :-

१) **पात्र उमेदवारांच्या अंतरिम तसेच अंतिम निकाल वरील संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल.**

अ) उमेदवाराची अंतिम निवड हि लेखी व व्यावसायीक परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (**Position**) दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण** मिळाल्यास खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार त्यानंतर

२) मागास वर्ग उमेदवाराच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमातीमधील नंतर अनूसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी १९९० - पूर्वीच्या २८ तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम) इतर मागासवर्ग या क्रमाने त्यानंतर

३) शारीरिक दृष्टया अपंग असलेले उमेदवार त्यानंतर

४) माजी सैनिक असलेले उमेदवार त्यानंतर

५) स्वातंत्र्य सैनिंकाचे पाल्य असलेले उमेदवार

६) वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

२) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेली सर्व मुळ प्रमाणपत्रे व शासन निर्णयाच्या अटीची संबंधीत नियुक्ती अधिकाऱ्यामार्फत (संबंधीत मंडळ अधीक्षक अभियंता) तपासणी करुन पुर्तता झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

❖ विशेष सूचना :-

१) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्रातील मुंबई/ पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती इत्यादी कोणत्याही परिमंडळात नियुक्ती देण्यात येईल.

२) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अभियंत्यांच्या बदल्या महाराष्ट्रात कोठेही करण्यात येईल.

३) गट क संवर्गातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक / लघुलेखक (उच्चश्रेणी) या संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना परिमंडळांतर्गत मुंबई / मुंबई उपनगरे ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग इत्यादी कोणत्याही ठिकाणी नियुक्ती दिली जाईल. रुजू झाल्यानंतर विहित केलेली खातेनिहाय / अन्य परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, त्याशिवाय त्यांची नियुक्ती नियमित समजली जाणार नाही.

४) महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचना,शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

५) शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदली करीता महाराष्ट्र बदली अधिनियम-२००५ मध्ये नमुद करण्यात आलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. विनियम व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२०१०/१०/१२ दिनांक ०३/०६/२०११ मधील निर्देशानुसार अन्यत्र बदलीच्या तरतूदी लागू राहतील.

६) शासन वित्तविभाग निर्णय क्र.अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५ नुसार दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. तथापी त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से.(निवृत्ती वेतनाचे अशंराशिकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

७) शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक २८.०३.२००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक ०१.०७.२००५ नुसार विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये शसनाने गट अ,ब,क व ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापत्र नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

८) शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांने सहा महिन्याच्या आत वैद्यकीय दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याकडून शासकीय सेवेत काम करण्यास पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्ती झालेल्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

९) शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांची नेमणुक त्याचे पुर्वचरित्र व वर्तवणूक (पोलीस एन्कॉएरी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना सेवेतुन काढून टाकण्यात येईल.

१०) **मागासवर्गीय आरक्षण** :- विमुक्त जाती (अ), भटक्या जामती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग अ (मुस्लीम धर्मीय) शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासवर्ग (मराठा समाज) ,

इतर मागास वर्ग या मधील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ३१/०३/२०१४ नंतरचे प्रमाणपत्र (Non Crimilayer Certificate) सादर करणे आवश्यक आहे. नियुक्तीनंतर ६ महिन्याचे आत उमेदवारांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

११) ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे, अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहील.

१२) **खेळांडूसाठी आरक्षण** :- फक्त अत्यूच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल केली आहे. क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील प्रमाणपत्र निवडीनंतर नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

१३) **भूकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण** :- हे आरक्षण कनिष्ठ अभियंता गट ब (अराजपत्रित) यांना लागू नाही. उर्वरीत गट क च्या पदांना ते लागू आहे. सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१४) **शासकीय व निमशासकीय कर्मचारी** :-त्यांनी त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत भरावे. परवानगीची प्रत, कागदपत्रे छाननीच्यावेळी सादर करावी.

१५) **महिलांसाठी आरक्षण** :- आरक्षणाची मागणी ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ३१/०३/२०१४ नंतरचे प्रमाणपत्र (Non Crimilayer Certificate) कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावे.

१६) **अंशकालीन उमेदवार** :- सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत तीन वर्षे दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर/पदवीधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक असून तशी नोंद ऑनलाईन अर्जात करावी. सदर प्रमाणपत्र व नोंदणीचे प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावे.

१७) **माजी सैनिकांसाठी आरक्षण :-** सशस्त्र दलात किमान ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिक /राजाधिष्ठ अधिकाऱ्यांना सैन्यातील कालावधी अधिक तीन वर्षे इतकी कमाल वयाची सवलत नियुक्तीसाठी देण्यात येईल म्हणजेच त्यांच्या वयातून सैनिकी सेवेचा कालावधी कमी केल्यावर परिणामभूत वय हे विहित वयोमर्यादेपेक्षा तीन वर्षाहून अधिक असावे.

१८) **अपंग :-** लेखी परिक्षेच्या वेळेस अपंग उमेदवारास लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑन लाईन अर्ज करतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा व परिक्षा शुल्क रु.१००/- अतिरिक्त भरणा करावे. ऐनवेळी लेखनिक पुरविला जाणार नाही.

१९) पदभरतीच्या अधिसुचना, शासन निर्णय व परिपत्रके आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळवरून उमेदवाराने स्वत: उपलब्ध करून घ्यावीत.

जा.क्र.काअ/एघ/भरती/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन
२५, मर्झ्बान रोड,फोर्ट,
मुंबई – ४०० ००१.
दुरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६
दिनांक -

सदस्य सचिव
तथा
कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
मुंबई-४०० ००१.

प्रत :- उप सचिव आस्थापना सा.बां.विभाग मंत्रालय यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- मा.मुख्य अभियंता (सा.बां.) प्रादेशिक विभाग,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- अधीक्षक अभियंता मुंबई (सा.बां.) मंडळ मुंबई व समन्वय अधीक्षक अभियंता मुंबई (सा.बां.) परिमंडळ मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- अध्यक्ष तथा अधीक्षक अभियंता विशेष प्रकल्प मंडळ वरळी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.